**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार, दिनांक २६ मार्च २०२४**

**ठळक बातम्या**

- **नागपूर लोकसभा मतदारसंघासाठी कॉंग्रेसचे उमेदवार विकास ठाकरे यांचा उमेदवारी अर्ज दाखल; भाजपचे उमेदवार नितीन गडकरी उद्या अर्ज भरणार.**
- **चंद्रपुरात भाजपचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार, तर गडचिरोली -चिमूर मतदार संघासाठी अशोक नेते यांचा उमेदवारी अर्ज दाखल.**
- **अकोला पश्चिमची पोटनिवडणूक रद्द-कॉंग्रेसच्या जनहित याचिकेवर नागपूर खंडपीठाचा निकाल.**
- **लोकसभा निवडणुकीत कामगार, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदानाच्या दिवशी मिळणार भरपगारी सुट्टी.**

*****

नामांकन

देशात सात टप्प्यात होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत उद्या २७ मार्च रोजी संपत असून, २८ तारखेला अर्जांची छाननी होणार आहे. या पहिल्या टप्प्यात राज्यातल्या नागपूर, रामटेक, चंद्रपूर, भंडारा-गोंदिया, आणि गडचिरोली-चिमूर या पाच लोकसभा मतदारसंघांचा समावेश असून, इथल्या उमेदवारांच्या नावांची घोषणा भारतीय जनता पक्ष आणि कॉंग्रेसनं केली आहे. या जागांसाठी १९ एप्रिलला मतदान होणार आहे. नागपूर लोकसभा मतदारसंघातून कॉंग्रेस आणि मित्र पक्षाचे उमेदवार विकास ठाकरे यांनी आज आपला उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडं सादर केला. त्यांच्यासोबत कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी खासदार विलास मुत्तेमवार, माजी मंत्री सतीश चतुर्वेदी, माजी मंत्री सुनील केदार, आमदार अनिल देशमुख यांच्यासह महाविकास आघाडीचे ज्येष्ठ नेते उपस्थित होते. त्याआधी नागपुरातील संविधान चौकातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून संविधान चौक ते आकाशवाणी चौकापर्यंत रैली काढण्यात आली. यावेळी आपला नामांकन अर्ज सादर करतांना कॉंग्रेसचे उमेदवार विकास ठाकरे यांनी सांगितलं की, ही लढाई एका हुकूमशाही विचारधारेच्या विरोधात असून, आज या रॅलीला स्वेच्छेनं कार्यकर्ते आले आहेत तसंच कॉंग्रेसचा प्रत्येक कार्यकर्ता

आणि सामान्य माणूस ही लढाई लढणार आहे. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात पूर्व विदर्भातील पाचही जागा महाविकास आघाडी जिंकेल, असा विश्वास व्यक्त केला. भाजपचे ज्येष्ठ नेते आणि नागपूर लोकसभा मतदार संघाचे भाजपचे उमेदवार नितीन गडकरी उद्या आपला अर्ज भरणार आहेत. गडकरी यांनी आज सदर इथल्या एसएफएस चर्चला सदिच्छा भेट दिली. यावेळी गडकरी यांनी आर्चबिशप एलियास गोन्साल्वीस यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली.

भाजप नामांकन

दरम्यान, आज चंद्रपूर मतदार संघासाठीचे भाजप उमेदवार सुधीर मुनगंटीवार आणि गडचिरोली -चिमूर मतदार संघासाठी भाजप उमेदवार अशोक नेते यांनी अर्ज भरला. आज चंद्रपुरात गांधी चौकात मुनगंटीवार यांनी देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांच्या उपस्थितीत सभेला संबोधित केलं. रॅलीद्वारे जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचत त्यांनी अर्ज सादर केला. आपण नेहमीच विकासाचं राजकारण केलं असून विकासवेगी राजकारणामुळंच जनता आपला मतरूपी आशीर्वाद आपल्याला देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तर लोकसभेच्या निवडणुकीत भाजप विरुद्ध काँग्रेस असा संघर्ष नसून, ही नरेंद्र मोदी विरुद्ध राहुल गांधी अशी लढाई आहे, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोली इथं केलं. महायुतीचे लोकसभेचे उमेदवार अशोक नेते यांचा उमेदवारी अर्ज भरल्यानंतर आयोजित मेळाव्याला फडणवीस यांनी संबोधित केलं. येणाऱ्या काळात गडचिरोली जिल्हा उद्योगात सर्वांत अग्रेसर जिल्हा असेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

रामटेक लोकसभा मतदार संघ

रामटेक लोकसभा मतदार संघासाठी गोवर्धन सोमदेवे, ॲड. उल्हास दुपारे, उमेश खडसे, शंकर चहांदे, संदीप गायकवाड आणि आशिष सरोदे या सहा जणांनी आज अर्ज दाखल केले. आतापर्यंत एकूण ७ अर्ज दाखल करण्यात आले आहेत. रामटेकसाठी आज ४२ अर्जांची उचल करण्यात आली, तर आतापर्यंत २०५ अर्जांची उचल करण्यात आली आहे.

मार्गदर्शक सूचना

उष्णतेच्या लाटेच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगानं सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. आगामी उन्हाळ्याच्या महिन्यांमध्ये सामान्य तापमानापेक्षा जास्त तापमानाची शक्यता भारतीय हवामान विभागानं वर्तवली आहे. आयोगानं उष्णतेच्या लाटेचा प्रभाव कमी करण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं जारी केलेल्या सूचनांची प्रत सामायिक केली आहे. रुग्णालयांची सर्वसमावेशक अग्निसुरक्षा ऑडिट आणि प्रत्यक्ष तपासणी करणं, अग्नी धोक्याचा अलार्म, धूरशोधक यंत्र, फायर हायड्रंट्स आणि फायर लिफ्ट्ससह अग्निरोधक यंत्रणा उपलब्ध आहे आणि ती पूर्णपणे कार्यरत आहे, याची खात्री करणं, अपुऱ्या विद्युतभार क्षमतेमुळं निर्माण होणाऱ्या समस्यांचं निराकरण करणं, याचा  यात समावेश आहे.

डॉ.नामदेव उसेंडी

काँग्रेसमध्ये धनाढ्य लोकांनाच उमेदवारी दिली जाते, असा गंभीर आरोप करीत माजी आमदार डॉ.नामदेव उसेंडी यांनी आज आदिवासी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्रातून काँग्रेस पक्षानं प्रदेश महासचिव डॉ.नामदेव किरसान यांना उमेदवारी दिली आहे. या जागेसाठी गडचिरोलीचे माजी आमदार आणि आदिवासी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष डॉ.नामदेव उसेंडी हेही इच्छुक होते. परंतु पक्षानं आपल्यासारख्या स्थानिकाला उमेदवारी न देता गोंदिया जिल्ह्यातील डॉ. किरसान यांना उमेदवारी दिली. किरसान हे धनाढ्य आहेत. त्यामुळं आपण काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिल्याचं उसेंडी यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं. आपण काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिलेला नाही. पक्षानं डॉ.किरसान यांना बदलून आपणास उमेदवारी दिली, तर आपला सन्मान होईल, असंही ते म्हणाले. सध्यातरी आपणास कोणत्याही अन्य पक्षाची उमेदवारीची ऑफर नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

मध्य रेल्वे

मध्य रेल्वे नागपूर विभागातर्फे 'कालाआखर' रेल्वे स्थानकावर आज ‘स्टेशन महोत्सव’ हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमाचा उद्देश समृद्ध

इतिहास आणि रेल्वे यंत्रणेच्या स्थापनेचा सन्मान करणं हा आहे. स्टेशन मास्टर, स्टेशन कर्मचारी आणि गावातील लोकांसह प्रमुख व्यक्तिमत्त्वांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम रंगला. मध्य रेल्वेनं समुदायाच्या सहभागाला चालना देण्यासाठी आणि रेल्वे क्षेत्रातील विकासात्मक प्रगतीबद्दल जागरुकता पसरवण्याच्या आपल्या समर्पणाची पुष्टी केली. दरम्यान, प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी 01139 नागपूर - मडगाव विशेष गाडी आता दि. ३ एप्रिल २०२४ ते २९ जून २०२४ पर्यन्त २७ फेऱ्या करणार आहे, तर 01140 मडगाव - नागपूर विशेष गाडी आता दि. ४ एप्रिल २०२४ ते दि. ३० जून २०२४ पर्यन्त २७ फेऱ्या करणार आहे. या गाड्यांचे थांबे आणि रचना समान राहतील.

पोटनिवडणूक रद्द

निवडून येणाऱ्या उमेदवाराला पुरेसा कालावधी मिळत नसल्यानं अकोला पश्चिमची पोटनिवडणूक रद्द झाली आहे. नियमानुसार निवडून आलेल्या सदस्याला कमीतकमी सहा महिने कालावधी मिळायला हवा. मात्र या पोटनिवडणुकीत नवीन सदस्याला केवळ चार महिन्याचा कालावधी मिळणार होता. ही जागा भारतीय जनता पक्षाचे आमदार गोवर्धन शर्मा यांच्या निधनामुळं रिक्त झाली होती. काँग्रेस नेते विवेक पारस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली अनिल दुबे यांनी ही जनहित याचिका दि. २० मार्चला दाखल केली होती. त्याचा निकाल नागपूर खंडपीठानं आज दुपारी दिला. त्यानुसार कलम १५१ प्रमाणं ही पोटनिवडणूक रद्द करण्यात आली आहे.

भरपगारी सुट्टी

राज्यातील लोकसभा मतदारसंघात पाच टप्प्यात मतदान होणार आहे. या लोकसभा निवडणुकीत कामगार, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदानाच्या दिवशी भरपगारी सुट्टी मिळणार आहे. याबाबतचं शासन परिपत्रक राज्य शासनानं जारी केलं आहे. राज्यात या निवडणुकीचं मतदान दि. १९ एप्रिल, २६ एप्रिल, ७ मे, १३ मे आणि २० मे - अशा पाच टप्प्यात होणार असून ही सुट्टी उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या सर्व उद्योग समूह, महामंडळं, कंपन्या आणि संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना आदींना लागू राहणार आहे. अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना पूर्ण दिवस सुट्टी देणं शक्य नसेल तर, मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी

सुट्टीऐवजी कमीत कमी दोन तासांची सवलत दिली जाणार आहे. मात्र त्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांची परवानगी घेणं आवश्यक राहील.

भीषण आग

बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव इथल्या औद्योगिक वसाहत परिसरात आज दुपारी २ वाजेच्या सुमारास एका कारखान्याला अचानक लागलेल्या भीषण आगीत कारखान्यातील वस्तू आणि इतर साहित्य जळून खाक झाल्यानं लाखो रुपयांचं नुकसान झालं आहे. अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी पोहोचल्या असून आग नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न सुरू असल्याचं  आमच्या प्रतिनिधीनं कळविलं आहे.

हवामान

नागपूर, वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोलीमध्ये तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडण्याचा अंदाज हवामान खात्यानं वर्तवला आहे. याशिवाय उर्वरित विदर्भात आज हवामान कोरडं राहणार आहे. आगामी आठवड्यात देखील हवामान सर्वत्र कोरडं राहणार असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. दरम्यान गेल्या २४ तासात  अकोला इथं विदर्भातील सर्वाधिक कमाल तापमान ४१ अंश सेल्सियस इतकं नोंदविण्यात आलं, तर नागपुरात आज किमान तापमान २०.६ दशांश अंश सेल्सियस इतकं नोंदविण्यात आलं. याशिवाय येत्या पावसाळ्यात जुलै ते सप्टेंबर या तीन महिन्यात भारतात सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडेल, असा अंदाज आशिया- प्रशांत आर्थिक सहकार्य हवामान केंद्रानं वर्तवला आहे. या केंद्रानं भारताविषयीचा यंदाचा पहिला हवामान अंदाज जाहीर केला आहे. एप्रिल ते जूनसाठीचा हवामान अंदाजही या केंद्रानं तयार केला आहे. अल निनोच्या सातत्यपूर्ण प्रभावामुळं यंदाचा उन्हाळा तीव्र असण्याची शक्यता असल्याचं भारतीय हवामानशास्त्र विभागाचे महासंचालक मृत्यूंजय महापात्रा यांनी सांगितलं आहे. मात्र उन्हाळ्यानंतर अल निनोचा परिणाम कमी होईल, अशी माहिती त्यांनी दिली. मान्सून हंगामाच्या उत्तरार्धात चांगला पाऊस पडेल, असा अंदाज आहे.

*****